# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ

## वृत्तप्रकाशन

## डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

२ ऑगस्ट २०१६

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाद्वारे दि. ०२/०८/२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता **डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या कार्यालयाचे उद्‌घाटन** विद्यापीठाच्या पाटकर हॉलमध्ये प्रमुख पाहुणे मा. श्री. राजकुमार बडोले (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री, महाराष्ट्र शासन) यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की, राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर करण्यासाठी घटनेच्या माध्यमाचे उपयोजन झाले पाहिजे. या वेळी विद्यापीठातील मागसवर्गीय मुलींसाठी वसतिगृह आणि डॉ. आंबेडकर विचार संशोधन केंद्र निर्माण करण्यासाठी सहकार्य आणि सहाय्य करण्याची हमीही त्यांनी दिली

हे अध्यासन ''इंटरडिसीप्लिनरी स्टडीज अ‍ॅन्ड अ‍ॅप्लिकेशन ऑफ थॉटस्‌ ऑफ डॉ. आंबेडकर'' या नावाने ओळखले जाईल. डॉ. आंबेडकर अध्यासनाच्या संचालिका प्रा. मधुरा केसरकर यांनी आपल्या स्वागतपर भाषणात सांगितले की, हे अध्यासन डॉ. आंबेडकर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवरील विचारधारांचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आले आहे आणि यासाठी १०० वर्षे जुन्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील विविध विषय विभागातील तज्ञ शिक्षकांचे सहाय्य घेण्यात येईल.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे श्री रमेश पांडव (प्राध्यापक आणि विभाग प्रमुख सिव्हील इंजिनियरींग विभाग, हायटेक इन्स्टिटयुट, औरंगाबाद) यांनी ''डॉ. आंबेडकर आणि राष्ट्रीय एकात्मता'' या विषयावर आपले विचार माडले. डॉ. आबेडकरांच्या १२५ व्या जयंतीच्या निमीत्ताने त्यांच्या प्रेरणादायक स्मृतीला आदरांजली वाहून त्यांनी डॉ. आंबेडकराच्या कार्याचा परिचय करून दिला. इंग्लड आणि अमेरिकेतून उच्च विद्याविभूषीत होऊन डॉ. आंबेडकरनी अनेक विषयात जवळपास २५ हजार पृष्ठाचे अभ्यासपूर्ण लिखाण केले आहे, ज्याचे विद्यार्थीवर्गाने परिशीलन करणे आवश्यक आहे असे डॉ. पांडव यानी भाषणात सांगितले. डॉ. आंबेडकरनी एका बलिष्ठ, एकात्म आणि आधुनिक भारताचे स्वप्न पाहिले आणि संपूर्ण भारतीयाना एक होण्याची हाक दिली. भारतीय घटना आणि हिंदू कोड बिल लिहून त्यांनी सर्वांना एकत्र येण्याची संधी उपलब्ध करून दिली. अनेक संघटनांची बांधणी करणारे, चार वृत्तपत्र चालवणारे डॉ. बाबासाहेब हे एक आधुनिक ऋषीच होते असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. विद्यापीठाला या अध्यासनाच्या शुभेच्छा देताना त्यांनी डॉ. आंबेडकराच्या विचारांचे उपयोजन विद्यापीठातील अध्ययन व अध्यापनात व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या मा. कुलगुरू प्रो. शशिकला वंजारी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून हे अध्यासन निर्माण करण्यासाठी सहाय्य करणाNया फाऊंडेशन बद्‌दल कृतज्ञता व्यक्त केली आणि ही संकल्पना प्रत्यक्षात आणणाऱ्या विद्यापीठातील कर्मचारी वर्गाचे त्यांनी अभिनंदन केले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यापीठातील मागसवर्गीय मुलींसाठी वसतिगृह आणि डॉ. आंबेडकर विचार संशोधन केंद्र निर्माण करण्यासाठी सहाय्य करण्याविषयी मा. मंत्री महोदयांकडे विनंती केली.

कार्यक्रमाची सांगता विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बडगुजर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.